# प्रकरण 2
# मॅन्युअल -1
# छोटी पुस्तिका –(1)

**माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत प्रकरण - दोन खंड (4) (1) (ख) (एक) अन्वये संस्थेची माहिती, कार्य आणि कर्तव्ये:-**

निवडणूक शाखा, करनिर्धारण व संकलन खात्यातील एक शाखा असून ती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूका व पोट-निवडणूका घेण्याचे काम राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका आयुक्तांना अधिनियम नियम 18A अन्वये जे अधिकार सुपूर्द केले आहेत, त्यानुसार करते.

सन 2021 चा महाराष्ट् अध्यादेश क्र. 13 अन्वये मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 5 मध्ये केलेल्या सुधारणेनुसार महापालिकेतील नगरसेवकांची एकूण सदस्यसंख्या 236 इतकी निश्चित करण्यात आली आहे, जे प्रत्येक प्रभागातून थेट निवडणूकीने निवडले जातील आणि महापालिका सभागृह 236 नगरसेवकांची मिळून बनेल, ज्याचा कालावधी 5 वर्षाचा असेल. मागील सार्वत्रिक निवडणुका फेब्रुवारी 2017 मध्ये घेतल्या गेल्या आहेत. यामुळे महानगरपालिकेच्या सभागृहाची मुदत 7 मार्च 2022 रोजी समाप्त झाली आहे. निवडणुकांची तयारी करणे, संचालन करणे ही प्रक्रीया नियतकालिक असली तरी महानगरपालकेचे हे कामकाज निरंतर चालते.

निवडणुकांच्या संचालनाकरिता निवडणूक खाते खालील प्राधिकाऱ्यांनी बनले आहे:-

1) निवडणूक अधिकारी
2) उप निवडणूक अधिकारी
3) निवडणूक निर्णय अधिकारी
4) मतदान केंद्राध्यक्ष, सहा.मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी

या अधिका-यांव्यतिरिक्त, परिमंडळनिहाय (शहर, पश्चिम व पूर्व उपनगरे) सहा. करनिर्धारक व संकलक (निवडणूक), निवडणूक अधीक्षक, निवडणूक पर्यवेक्षक आणि निवडणूक निरीक्षक हे कर्मचारी निवडणुकीच्या कामात मदत करीत असतात आणि आंतरवृंद विभागात कार्यालय अधीक्षक, मुख्य लिपिक, लिपिक यांना महानगरपालिकेच्या नगरसेवकांच्या निवडणुकीच्या कामासाठी नेमलेले असते व ते कर्मचारी निवडणूक निकालापर्यंतची सर्व कामे पार पाडत असतात.

एकंदरीत निवडणूक शाखेला खालील कर्तव्ये पूर्ण करावी लागतात.

1)राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाने अद्ययावत जनगणनेच्या लोकसंख्येचा आकडेवारीप्रमाणे निवडणूक प्रभागांच्या सिमा निश्चित करणे व त्याबाबत प्राप्त झालेल्या हरकती,सूचना आणि आक्षेप विचारात घेवून अंतिम प्रसिध्दी देणे.

2) जिल्हाधिकारी मुंबई शहर व मुंबई उपनगर यांनी तयार केलेल्या विधानसभा मतदार याद्या प्रभागनिहाय जशाच्या तशा विभागून व अधिप्रमाणित करून प्रसिध्द करणे.

3)मतदानाची आणि मतमोजणीची कामे करण्यासाठी शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी शाळांतील कर्मचा-यांची नेमणूक करणे.

4)निवडणूका घेण्यासाठी तसेच त्या संबंधित इतर कामे यांच्या संपूर्ण खर्चाची अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात तरतुद करणे आणि त्यासाठी आयुक्त / स्थायी समिती / महापालिका यांची मंजुरी मिळविणे.

5)उपरोक्त तत्कालिक कामकाजाव्यतिरिक्त निवडणूक शाखेला खालील कामकाज पार पाडावे लागते.

1) मतदारांनी मागणी केल्यानुसार त्यांना निवडणूक कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या मनपा सार्वत्रिक निवडणूक 1960,1967,1972,1978,1985, 1992,1997,2002,2007,2012,2017 आणि 2022 च्या मतदार याद्या तपासणी करीता उपलब्ध करुन देणे.

2) मतदार यादीतील मतदार असल्याबाबतचे उतारे देणे.

3) निवडणूक न्यायालयीन दाव्यांच्या संदर्भातील, न्यायालयीन प्रकरणात न्यायालयात उपस्थित राहणे.

4) निवडणूक याचिका व इतर कामकाजाकरिता मनपाच्या कायदा विभागाशी समन्वय ठेवणे.

5) राज्य निवडणूक आयोगाच्या ई.व्ही.एम. सुरक्षित जतन करणे.

6) निवडणूक स्टेशनरी गोदाम परिरक्षण करणे.

7) नागरिक आणि शासकीय कार्यालयाकडून प्राप्त पत्रांबाबत उचित कार्यवाही करणे.

8) माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त अर्जाबाबत उचित कार्यवाही करणे.

9) राज्य निवडणूक आयोग,नगरविकास विभाग,जिल्हाधिकारी शहर व उपनगर आणि विभागीय आयुक्त कोकण यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने पूर्तता करणे.

--------